फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (१९७४ चा अधिनियम दोन)प्रकरण वीस अन्वये संपरीक्षा केलेला **२०२२** चा अविलंबित खटला अनुक्रमांक २८६२ हा अभिलेख. श्री.एम.बी.कुडते, तिसरे सह दि.न्या.क.स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी (कोर्ट नं.३), गोंदिया.

**नि.क्र.**

१. अपराध घडल्याचा दिनांक ... .... २३.०६.२०२२.

२. अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक .... २३.०६.२०२२.

३. फिर्यादीचे नांव,त्याच्या आई व बापाचे नांव,त्याचे वय व त्याचे निवासस्थान इ. .... महाराष्ट्र शासनातर्फे पोलीस ठाणे, गोंदिया ग्रा.

४. आरोपीचे नांव,आरोपीच्या आई व बापाचे नांव ,त्याचे वय व त्याचे निवासस्थान इ. .... राजेंद्र मनोहर कावळे वय वर्षे, धंदा- चालक रा. कुडवा, ता. जी. गोंदिया.

५. ज्याबददल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावुन सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील.

तुम्ही दिनांक २३.०६.२०२२ रोजी ९.३० ते १०.०० वा. सुमारास मौजे गोरेगांव रोड, गोंदिया येथील रस्त्यावर तुम्ही तुमच्या ताब्यातील वाहन क्र. **MH-35/AGZ-2423** ही भरधाव वेगात, निष्काळजीपणे, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवित असताना मिळुन आलात व त्यामुळे तुम्ही मोटारवाहन कायदा कलम १८४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला.

६) आरोपीचे प्रतिकथन :- मला गुन्हा कबुल आहे.

____________________

(आरोपीची सही / अंगठा)

स्वा/-
(एम.बी.कुडते)
न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग,
(कोर्ट नं.३),गोंदिया..

गोंदिया.
दिनांक : १०.१०.२०२२.

**आदेश**

(दिनांक १०.१०.२०२२)

आज आरोपी न्यायालयासमोर प्रस्तुत प्रकरणात हजर झाला. त्यांनी पुरसिस दिल्याप्रमाणे स्वत:हून गुन्हा कबूल केला, त्यामुळे आरोपी शिक्षेस पात्र आहे. शिक्षेबाबत दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकण्यात आला. तसेच न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले. आरोपी सुरुवातीच्या पायरीला स्वत:हून गुन्हा कबुल करत आहे. त्यामुळे गुन्हयाचे स्वरुप, आरोपीची आर्थिक परिस्थिती व आरोपीचा गुन्हा कबुल करण्याबाबतचा प्रामाणिकपणा विचारात घेता खालील प्रमाणे आरोपीला शिक्षा देणे योग्य व संयुक्तिक वाटते. करीता, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

आरोपी राजेंद्र मनोहर कावळे, रा. कुडवा, ता. जी. गोंदिया, यास मो.वा.अ.चे कलम १८४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधासाठी दोषी धरण्यात आले असुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये त्यास रक्कम रुपये १,०००/- अक्षरी ( एक हजार रूपये मात्र) दंड भरण्याची व दंड न भरल्यास ०२ दिवसाच्या साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येते.

स्वा/-
(एम.बी.कुडते)
न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग,
(कोर्ट नं.३),गोंदिया..

गोंदिया.
दिनांक : १०.१०.२०२२.